जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 NOV 2024
लोकमत

# पन्हाळ्याला तैवानच्या शास्त्रज्ञांची भेट

## शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राची घेतली माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**पन्हाळा :** शिवाजी विद्यापीठ आणि तैवानच्या नॅशनल डोंग विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार झाला असून, या करारांतर्गत शिवाजी विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी व विद्यापीठातील प्राध्यापक यांना तैवान येथे अभ्यास, वैज्ञानिक प्रकल्प आणि संशोधन कार्य करण्यास मार्ग मोकळा झाला आहे. यानिमित्ताने त्यांनी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राला सदिच्छा भेट दिली.

या भेटीदरम्यान त्यांनी अवकाश संशोधन केंद्रामध्ये कार्यरत असणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांशी संवाद साधून विविध अत्याधुनिक उपकरणांची आणि केंद्रामध्ये सुरू असलेल्या संशोधन कार्याची माहिती घेतली. अत्याधुनिक सिस्टर फिफ्टी आणि १२ इंची दुर्बिणीच्या साह्याने आकाश निरीक्षणाचा आनंदही लुटला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. राजीव हटकर, तैवान येथील प्रा. चांग, प्रा. चिन-चिह ली, प्रा. वँग-ची येह, प्रा. यी चिआ चेन, के. के. शर्मा, आदी उपस्थित होते.

10 NOV 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रास तैवानच्या शास्त्रज्ञांची भेट

पन्हाळा : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ आणि तैवान येथील नॅशनल डोंग ह्वा विद्यापीठ (NDHU) यांच्या दरम्यान करार करण्यात आला आहे. या करारा अंतर्गत शिवाजी विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास शिकत असलेले विद्यार्थी तसेच विद्यापीठातील प्राध्यापक यांना तैवान येथे अभ्यास, वैज्ञानिक प्रकल्प आणि संशोधन कार्य करण्यास मार्ग मोकळा झाला आहे. या कराराच्या निमित्ताने त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राला सदिच्छा भेट दिली.

या भेटीदरम्यान त्यांनी अवकाश संशोधन केंद्रामध्ये कार्यरत असणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांशी संवाद साधून अत्याधुनिक उपकरणांची आणि संशोधन कार्याची माहिती जाणून घेतली.

तसेच अत्याधुनिक सिस्टर फिफ्टी आणि १२ इंची दुर्बिणीच्या साहाय्याने आकाश निरीक्षणाचा आनंदसुद्धा लुटला. अशी माहिती अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

यावेळी तैवान येथील प्रा. चांग, प्रा. चिन-चिह ली, प्रा. वँग-ची येह, प्रा. यी चिआ चेन, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे डायरेक्टर डॉ. के. के. शर्मा आणि आणि डॉ. डोंगळे उपस्थित होते.



पन्हाळा : येथील अवकाश संशोधन केंद्राच्या भेटीप्रसंगी समन्वयक डॉ. राजीव व्हटकर, तैवानच्या नॅशनल डोंग ह्वा विद्यापीठाचे प्रा. चांग, प्रा. चिन-चिह ली, प्रा. वँग-ची येह, प्रा. यी चिआ चेन उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 NOV 2024

पुण्यनगरी



पन्हाळा : येथील विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राला तैवान येथील शास्त्रज्ञांनी भेट दिली.

# विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राला तैवानच्या शास्त्रज्ञांची भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ आणि तैवानच्या नॅशनल डोंग हवा विद्यापीठ यांच्यामध्ये सामंज्यस्य करार करण्यात आला. या करारा अंतर्गत शिवाजी विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास शिकत असलेले विद्यार्थी, तसेच विद्यापीठातील प्राध्यापक यांना तैवान येथे अभ्यास, वैज्ञानिक प्रकल्प आणि संशोधन कार्य करण्यास मार्ग मोकळा झाला आहे. कराराच्या निमित्ताने त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राला सदिच्छा भेट दिली.

या भेटीदरम्यान त्यांनी अवकाश संशोधन केंद्रामध्ये कार्यरत असणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांची संवाद साधून विविध अत्याधुनिक उपकरणांची आणि केंद्रामध्ये सुरू असलेल्या संशोधन कार्याची प्रामुख्याने माहिती जाणून घेतली. तसेच अत्याधुनिक सिस्टर फिफ्टी आणि १२ इंची दुर्बिणीच्या साहाय्याने आकाश निरीक्षणाचा आनंद सुद्धा लुटला, अशी माहिती अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव हटकर यांनी दिली. याप्रसंगी तैवान येथील प्रा. चांग प्रा. चिन-चिह ली, प्रा. वँग-ची येह, प्रा. यी चिआ चेन, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे डायरेक्टर डॉ. के. के. शर्मा, डॉ. डोंगळे हे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 NOV 2024
सकाळ



**पन्हाळा :** येथील अवकाश संशोधन केंद्राच्या भेटीप्रसंगी तैवानच्या नॅशनल डोंग विद्यापीठचे, प्रा. चांग, प्रा.चिन-चिह ली, प्रा. वँग-ची येह, प्रा. यी चिआ चेन यांना माहिती देताना समन्वयक डॉ. राजीव व्हटकर.

# पन्हाळा अवकाश संशोधन केंद्रास तैवान विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांची भेट

## अत्याधुनिक दुर्बिणींतून अवकाश निरीक्षण

**सकाळ वृत्तसेवा**

पन्हाळा, ता. ९ : शिवाजी विद्यापीठ आणि तैवान येथील नॅशनल डोंग विद्यापीठ यांच्या दरम्यान सामंजस्य करार झाला आहे. या कराराअंतर्गत शिवाजी विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकत असलेले विद्यार्थी तसेच विद्यापीठातील प्राध्यापक यांना तैवान येथे अभ्यास, वैज्ञानिक प्रकल्प व संशोधन कार्य करण्यास मार्ग मोकळा झाला आहे. या कराराच्या निमित्ताने तैवानच्या शास्त्रज्ञांनी शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राला भेट दिली.

या भेटीदरम्यान त्यांनी अवकाश संशोधन केंद्रामध्ये कार्यरत असणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांची संवाद साधला. विविध अत्याधुनिक उपकरणांची व केंद्रामध्ये सुरू असलेल्या संशोधन कार्याची माहिती घेतली. तसेच अत्याधुनिक सिस्टर फिफ्टी व १२ इंची दुर्बिणींच्या साहाय्याने अवकाश निरीक्षण केले, अशी माहिती अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

यावेळी तैवान येथील प्रा.चांग, प्रा. चिन-चिह ली, प्रा.वँग-ची येह, प्रा. यी चिआ चेन, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे डायरेक्टर डॉ. के. के. शर्मा व डॉ. डोंगळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 NOV 2024
तरुण भारत

# पन्हाळ्यातील अवकाश संशोधन केंद्राला तैवानच्या शास्त्रज्ञांची भेट

## सामंजस्य करारांतर्गत संशोधन, शैक्षणिक देवाण-घेवाण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आणि तैवानच्या नॅशनल डोंग हवा विद्यापीठाशी करार झाला आहे. या कराराच्या निमित्ताने तैवान येथील शास्त्रज्ञांनी शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी अवकाश संशोधन केंद्रामध्ये कार्यरत असणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांची संवाद साधून अत्याधुनिक उपकरणांची आणि केंद्रामध्ये सुरू असलेल्या संशोधनाची माहिती घेतली.

तैवान येथील विद्यापीठाबरोबर झालेल्या करारांतर्गत शिवाजी विद्यापीठातील पद्युत्तर अभ्यासक्रमास शिकत असलेले विद्यार्थी तसेच विद्यापीठातील प्राध्यापक यांना तैवान येथे अभ्यास, वैज्ञानिक प्रकल्प आणि संशोधन कार्य करण्यास मार्ग मोकळा झाला आहे. तैवान येथील संशोधकांनी अत्याधुनिक सिस्टर फिफ्टी आणि १२ इंची दुर्बिणीच्या साह्याने आकाश निरीक्षणाचा आनंद लुटला, अशी माहिती अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव हटकर यांनी दिली. याप्रसंगी तैवान येथील प्रा. चांग, प्रा. चिन-श्रिह ली, प्रा. वँग-ची येह, प्रा. यी चिआ चेन, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. के. के. शर्मा, डॉ. डोंगळे आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राची पाहणी करताना तैवान येथील संशोधक.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 NOV 2024

तरूण भारत

# पदविका, पीएच. डी. प्रवेशपूर्व परीक्षा मंगळवारपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील ८५० परीक्षा विधानसभा निवडणुकीमुळे पुढे ढकलण्यात आल्या होत्या. विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयात होणाऱ्या डिप्लोमा व सर्टीफिकेट कोर्स परीक्षा व पीएच. डी. प्रवेश पूर्व परीक्षा १२ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहेत. तर पीएच. डी. प्रवेश पूर्व परीक्षेला ३ हजार २२० विद्यार्थी बसणार आहेत. तसेच रिसर्च अॅण्ड पब्लिकेशन इथेक्स परीक्षा १६ नोव्हेंबरला होणार आहे.

पीएच. डी. प्रवेशपुर्व परीक्षा कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन परीक्षा केंद्रावर होणार आहे. पीएच. डी. प्रवेश पुर्व परीक्षा १३ नोव्हेंबरला संपणार आहे. शिवाजी विद्यापीठाने स्वत:चे एसआरपीडी सिस्टम तयार केली असून याच्या माध्यमातून परीक्षेची प्रश्नपत्रिका पाठवली जाणार आहे. त्यामुळे महाविद्यालय व अधिविभागातील एसआरपीडी समन्वयकांना ११ नोव्हेंबरला एसआरपीडीसंदर्भात प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तशेच परीक्षेत कोणतीही अडचण येवू नये यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्नशील आहे. ज्या शिक्षकांना निवडणूक ड्यूटी असेल त्यांना यथावकाश एसआरपीडीचे प्रशिक्षण देण्यात येईल. विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा २५ नोव्हेंबरपासून सुरू होत आहेत. ही परीक्षा १ लाख ८५ हजार १९३ विद्यार्थी देणार आहेत. विद्यापीठ प्रशासनाने प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका आणि परीक्षा केंद्रांची संपूर्ण तयारी केली आहे. तसेच परीक्षेत कोणताही गैरप्रकार घडू नये म्हणून बैठ्या व फिरत्या भरारी पथकांची नियुक्ती केली आहे. तरी विद्यार्थ्यांनी नियमानुसार परीक्षा द्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

- **११ नोव्हेंबरला एसआरपीडी समन्वयकांना प्रशिक्षण**
- **पदवी व पदव्युत्तरच्या ८५० परीक्षांना १ लाख ८५ हजार १९३ विद्यार्थी बसणार**

